|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

## अठ्ठाविसाव्या दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने सर्व पीएच.डी. पदवीधारक विद्यार्थ्यांना सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा अठ्ठाविसावा दीक्षांत समारंभ **मा.प्रा.डॉ. प्रदीप प्रेमचंद पाटील, कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांच्या अध्यक्षतेखाली **शनिवार, दिनांक ०४ जानेवारी, २०२० रोजी** क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव येथे विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात **सकाळी १०.०० वाजता** आयोजित केला आहे. ह्या प्रसंगी **मा. श्री. सुनिल देशमुख, माजी व्यवस्थापकीय संचालक आणि प्रमुख, वस्तू व्युत्पन्न व्यापार, सिटी बँक, अमेरिका (मानवतावादी आणि सामाजिक उद्योजक)** हे दीक्षांत भाषण करणार आहेत.

त्या अनुषंगाने अठ्ठाविसावा दीक्षांत समारंभासाठी ज्या पीएच.डी. पदवीधारक विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केले असतील त्यांनी दिनांक ०४ जानेवारी, २०२० रोजी सकाळी ०८.०० ते ९.३० व दुपारी ०२.०० ते ४.०० दरम्यान विद्यापीठाच्या प्रशासकिय इमारतीतील तळमजल्यावरील दालन क्र.१११ मधील खिडकी क्र. ११ वरील प्रमाणपत्र वितरण केंद्रावरुन स्वीकृत करावेत.

तसेच मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी, प्र.कुलसचिव, अधिष्ठाता व प्र.अधिष्ठाता यांच्या समवेत शनिवार, दिनांक ०४ जानेवारी,२०२० रोजी समारंभाची सांगता झाल्यानंतर सर्व पीएच.डी. पदवीधारकांचे सामुहिक छायाचित्र (Group Photo Session) घेण्याचे आयोजित केले आहे. तेव्हा, सर्व संबंधितांनी नियोजीत वेळेत दीक्षांत सभागृहाच्या मंचावर उपस्थित राहावे.

<u>पीएच.डी. पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी पोशाख खालीलप्रमाणे</u>:-

(१) <u>विद्यार्थी</u>:- पांढ-या रंगाचा शर्ट, पांढ-या रंगाची पॅन्ट किंवा पांढ-या रंगाचा नेहरु शर्ट आणि पांढ-या रंगाचा चुस्त पायजमा.

(२) <u>विद्यार्थीनी</u>:- लाल किनार असलेली पांढरी साडी, लाल रंगांचे ब्लाऊज किंवा लाल रंगाचा कुर्ता (कमीज) व पांढ-या रंगाची सलवार.

(भ. प्र. पाटील)
**संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दिनांक २८.१२.२०१९